लोकमत

# वसतिगृहासाठी अर्ज केला तरच 'स्वाधार' योजनेचा मिळणार लाभ

## १५ सप्टेंबरपर्यंत मुदत : पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे 'समाजकल्याण'चे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आता शासकीय वसतिगृह प्रवेशाचा ऑनलाइन अर्ज केलेला असणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच या योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य दिले जाईल.

पुणे जिल्ह्यात वसतिगृहातील मर्यादित जागांमुळे अनेक पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शिक्षण, भोजन आणि निवासासाठी स्वाधार योजनेतून अर्थसाहाय्य पुरवले जाते. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबरपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे.



### मोफत वसतिगृहाची सुविधा

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी समाजकल्याण विभागामार्फत मोफत वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना निवासासह मोबाइलसाठी वायफाय, भोजन, निर्वाहभत्ता आणि अभ्यासासाठी आवश्यक इतर सुविधा मोफत पुरविल्या जातात.

### प्रवेश न मिळालेल्यांसाठी

वसतिगृहात मर्यादित जागांमुळे ज्या पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकत नाही, त्यांच्यासाठी 'स्वाधार योजना' राबवली जाते. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक खर्चासाठी थेट आर्थिक मदत दिली जाते. पात्र विद्यार्थी hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करू शकतात. पात्र आणि इच्छुक विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी आपला ऑनलाइन अर्ज सादर करून पावती जतन करून ठेवावी.

Hello Pune
Page No. 6 Aug 27, 2026
Powered by: erelego.com